**नि.फौ.के. नं. ३९/२०१९**

**नि. क्र. ६४**

**सरकारतर्फे साक्षीदार क्र. ०८ चा जबाब**

**नाव** – अमोल सदानंद केळकर,

**वय**– ४० वर्षे, **व्यवसाय** – शाखाधिकारी, ब्राम्हण हितवर्धीनी ग्रामिण बिगरशेती सहकारी, पतसंस्था, शाखा रत्नागिरी.

**<u>सरकारतर्फे सरतपास सरकारी वकील श्रीम. ए. व्ही. गुरुपादगोळ यांचेतर्फे</u> –**

०१. मी गेल्या १४ ते १५ वर्षापासून ब्राम्हण हितवर्धीनी ग्रामिण बिगरशेती सहकारी, पतसंस्थेत, कार्यरत आहे. दि. २३/०६/२०१५ रोजी जयसिंग गोपाळ राणे आमच्या पतसंस्थेत आले होते. ते वाहन तारण कर्ज मागणीसाठी आले होते. त्यांनी रक्कम रु. १५,००,०००/– लाखाची मागणी केली होती. जुनमध्ये ते कर्ज मंजूर होऊन आले. जुलैमध्ये कर्ज वितरीत झाले. रक्कम रु. १५,१२,०००/– सुमारे इतकी रक्कम आमच्या जनता सह. बॅक, शाखा देवरुख येथील खात्यावरुन Tauras Auto Dealers Kolhapur यांच्या स्टेट बॅक मैसुरस, शाखा कोल्हापुर या बॅकेच्या खात्यावर ट्रान्सफर झाली. ही रक्कम आरटीजीएस व्दारे ट्रान्सफर झाली होती.

०२. जानेवारी २०१६ मध्ये राणे यांनी वाहन खरेदी केले. त्यानंतर आम्ही त्यांच्याकडे कागदपत्रांची मागणी करत होतो. गाडीच्या संदर्भातील पासींगच्या कागदपत्रांची मागणी करत होतो. मात्र ते वेळोवेळी टाळाटाळ करु लागले. सप्टेंबर २०१६ पर्यंत त्याचे खाते मोठ्या प्रमाणात थकीत राहीले. त्या संदर्भात आम्ही त्यांना मागणी केली असता साधारण दोन लाखाच्या आसपास सुमारे रक्कम त्यांनी पतसंस्थेत भरली. उरलेल्या रकमेसाठी त्यांनी आम्हाला रक्कम रु. १,०५,०००/– चा बॅक ऑफ इंडिया, शाखा देवरुख या बॅकेचा चेक दिला. तो धनादेश अनादरीत झाल्याने आम्ही त्यांच्या विरुध्द निगोशिएबल इन्स्ट्रुमेन्ट अॅक्ट कलम १३८ प्रमाणे कारवाई देखील केली होती.

०३.           ती केस चालु असताना राणे यांनी रक्कम रु. १,०५,०००/– पतसंस्थेत जमा केली. तरी देखील त्यांचे खाते थकीतच होते. त्यांनी अद्याप गाडीचे कागदपत्र आम्हाला दिलेले नाही. त्या संदर्भात आम्ही खाजगी तक्रार देखील न्यायालयात दाखल केलेली आहे. सप्टेंबर २०१६ अखेर त्यांचे रक्कम रुपये सुमारे ५,००,०००/– लाखाच्या आसपास थकबाकी बाकी होती.

०४.           में २०१८ मध्ये त्याच्या विरुध्द गुन्हा दाखल झाला होता. पोलीसांना मी आमच्या पतसंस्थेबाबत झालेल्या अपहारा बाबत सर्व माहीती सांगीतली होती. माझ्या सांगण्यानुसार ती माहीती नोंद करण्यात आली होती. मी ती वाचून देखील पाहीली होती. मी जयसिंग राणे यांना पाहील्यास ओळखु शकतो. आज रोजी ते न्यायालयात हजर नाहीत.

**सरतपास पुर्ण.**

**<u>उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री. आर. के. शिंदे यांचेतर्फे</u> –**

०५.           माझे गाव खेड आहे. मी स्वतः पोलीस स्टेशनला गेलो होतो. मी फिर्यादीला ओळखत नाही. मला फिर्यादीने दाखल केलेल्या केस बाबत माहीती नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या पतसंस्थेच्या व्यतिरिक्त इतर कोणतीही चौकशी पोलीसांनी माझ्याकडे केली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, आज रोजी असलेल्या केसमध्ये माझ्या नावचे टिपण असल्यास ते कसे आले मला माहीती नाही. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासातील माहीती खोटी आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर निवेदन स्विकृत,**

SHRUTI HANUMANTRAO PATIL

Digitally signed by SHRUTI HANUMANTRAO PATIL
Date: 2024.07.30 15:35:17 +0530

**(श्रीमती एस.एच.पाटील)**

**दिनांक ३०/०७/२०२४**                    **न्यायदंडाधिकारी वर्ग–१ देवरुख.**